

# आदिवासी समाज :
## प्रश्न आणि आव्हाने

डॉ. जयश्री महाजन | प्रा. सागर बडगे

अथर्व पब्लिकेशन्स्

आदिवासी समाज : प्रश्न आणि आव्हाने

© सुरक्षित

ISBN : 978-93-86196-43-9

**प्रकाशक**

युवराज भटू माळी

अथर्व पब्लिकेशन्स्

धुळे १७, देवीदास कॉलनी, वरखेडी रोड,
धुळे - ४२४००१.

संपर्क ९४०५२०६२३०

जळगाव तळमजला, ओम हॉस्पिटल,
अँग्लो उर्दू हायस्कूलजवळ, ढाके कॉलनी,
जळगाव - ४२५००१.

संपर्क ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७

ई-मेल atharvapublications@gmail.com

वेबसाईट www.atharvapublications.com

**प्रथमावृत्ती**

३ फेब्रुवारी २०१७

**अक्षरजुळवणी**

अथर्व पब्लिकेशन्स्

**मूल्य**

₹ ७००/-

**ऑनलाईन पुस्तक खरेदीसाठी भेट द्या**
**www.atharvapublications.com**

- या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी - फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या व लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.
- सदरील पुस्तकातील लेखातील मते हि त्या-त्या लेखकांची वैयक्तिक आहेत. त्या मताशी प्रकाशक व संपादक सहमत असतीलच असे नाही.

# पुणे जिल्ह्यातील महादेव कोळी स्त्रियांच्या स्थितीचा शिक्षण व आरोग्य या मुद्यांआधारे अभ्यास

**डॉ. माधवी रेणावीकर**
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,पुणे

**प्रास्ताविक–** आदिवासी, ग्रामीण आणि नागरी असे भारतीय समाजाचे तीन विभाग दिसतात. प्रस्तुत अभ्यासामध्ये पुणे जिल्ह्यातील महादेव कोळी या आदिवासी जमातीतील स्त्रियांच्या सद्यस्थितीचा शिक्षण व आरोग्य या चलांआधारे अभ्यास करण्यात आला आहे. भारतातील महादेव कोळींची लोकसंख्या १७,३६,००० आहे.

आदिवासी हा शब्द aboriginal या इंग्लिश शब्दावरुन तयार झाला आहे. याचा अर्थ अगदी मूळचे रहिवासी, म्हणजेच आधीपासून राहणारे रहिवासी. आदिवासींच्या जीवनाचा अभ्यास करणा–या अनेक अभ्यासकांना असे आढळून आले आहे की, आदिवासी समाजाचा इतिहास दीर्घकालीन आहे. आदिवासी समाज आधुनिक समाजापेक्षा काही बाबतीत कमी विकसीत झालेला आढळतो. हे खरे असले तरी त्यांचे आचार-विचार व समाजव्यवस्था खरोखरीच वाखाणण्याजोगी आहे. त्यांची सामाजिक नियमनाची व्यवस्था व परंपरेचे काटेकोर पालन हेच त्यांच्या समाजसातत्याचे प्रमुख कारण आहे. आदिवासी म्हणजे कोण ? याबाबत विविध अभ्यासकांनी विविध व्याख्या केल्या आहेत. आदिवासींची सर्व लक्षणे लक्षात घेऊन त्यांची विस्तृत व्याख्या डी.एन्. मुजुमदार यांनी केली आहे. त्यांच्या मते, मसमान नाव असणारा, एकच भाषा बोलणारा व विवाह, व्यवसाय इत्यादी बाबतीत समान निषेध नियमांचे पालन करणारा व परस्पर उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने एक पद्धतशीर व्यवस्था स्वीकारणाऱ्या कुटुंबाचे किंवा कुटुंब समूहाचे एकत्रीकरण म्हणजे आदिवासी समाज होय . काही विचारवंतांच्या मते, भारतात आर्यांचे आगमन होण्यापूर्वी हे आदिवासी टोळ्याटोळ्यांनी राहत होते. आर्यांनी भारत काबीज केल्यावर स्वतःचे अस्तित्व टिकविण्यासाठी पराभूत झालेल्या काही टोळ्या दऱ्याखोऱ्यांच्या व जंगलाच्या आश्रयाला जाऊन राहिल्या. त्यामुळे त्यांना मगिरीजन असेही म्हटले जाते. (: अद्यंताया, २००२, पृ.क्र. १०७)

गिलीन व गिलीन यांच्या मते, मएका विशीष्ट भूप्रदेशात राहणाऱ्या, समान बोलीभाषा बोलणाऱ्या, समान सांस्कृतिक जीवन जगणाऱ्या पण

अक्षरओळख नसलेल्या स्थानिक गटांच्या समुच्चयाला आदिवासी समाज म्हणतातफ

आदिवासी समिती परिषद एका समान भाषेचा वापर करणाऱ्या, एकाच पूर्वजापासून उत्पत्ती सांगणाऱ्या, एका विशिष्ट भू-प्रदेशात वास्तव्य करणाऱ्या, तंत्रशास्त्रीय ज्ञानाच्या दृष्टीने मागासलेल्या, अक्षरओळख नसलेल्या आणि रक्तसंबंधांवर आधारित सामाजिक व राजकीय रीतीरिवाजांचे प्रामाणिकपणे पालन करणाऱ्या एकजिनसी गटाला आदिवासी समाज म्हणतात.

डॉ. गोविंद गारे- आदिवासी या शब्दाचा शब्दशः अर्थ आदीपासून, प्राचीन काळापासून या भूमीवर वास्तव्य करणारे ते आदिवासी होत. (: वाघमारे, २०१६ पृ.क्र. ४८) महाराष्ट्रातील आदिवासी- एकूण ४७ अनुसूचित जमाती. राज्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी १६.५ टक्के म्हणजे ५० हजार ७५७ चौ. कि.मी. इतके मोठे आदिवासी क्षेत्र आहे. राज्यातल्या १५ जिल्ह्यांमध्ये आणि ६८ तालुक्यांमध्ये आदिवासींची संख्या मोठी आहे. २००१ सालच्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात आदिवासींची लोकसंख्या ८५ लाखांहून अधिक होती. म्हणजे राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ८.८५ टक्के देशातील एकूण आदिवासींपैकी १० टक्के आदिवासी महाराष्ट्रात राहतात. देशात आदिवासी लोकसंख्येबाबात मध्य प्रदेशा खालोखाल महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे. (: वाघमारे, २०१६, पृ.क्र. १७९).

महाराष्ट्रातील आदिवासी स्त्रियांमध्ये कुपोषणाचे प्रमाण देशपातळीपेक्षा अधिक आहे. राज्यातील ५१.६ %आदिवासी स्त्रियांचा बॉडी-मास इंडेक्स १८.५ पेक्षा कमी आहे. भारतामध्ये हेच प्रमाण ४६.६ % आहे. (:वाघमारे, २०१६, पृ.क्र. १८०) ४७% हून अधिक आदिवासी महिलांमध्ये मुरलेला अशक्तपणा आहे. (:वाघमारे, २०१६, पृ.क्र. १५४) २००१ साली आदिवासी साक्षरांची संख्या ४७.१% नोंदविली गेली. त्यावेळी आदिवासी स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण ३४.७६ होते (: वाघमारे, २०१६, पृ.क्र. १५९). २००१ मध्ये आदिवासी स्त्री साक्षरतेचे प्रमाण ४२.१% इतर स्त्रियांमध्ये हे प्रमाण ६७.००% (: वाघमारे, २०१६, पृ.क्र. १३९).

**महादेव कोळी जमातीची सामाजिक व सांस्कृतिक वैशिष्टे**

सह्याद्रीत पुणे ते मुळशीपर्यंत व पुणे ते त्रिंबकपर्यंत आढळतात. जव्हारलाही यांची वस्ती. बालाघाट उर्फ महादेव डोंगरात त्यांचे मूळ वसतिस्थान असावे असे परंपरा सांगते. अहमदनगर जिल्ह्यातही ते आढळतात.महादेव कोळी आणि मल्हार कोळ्यापैंकी पानभरे कोळी हे गडकरी होते. गडसंरक्षणाचे काम ते करीत. महादेव कोळ्यांची गोत्र नावे व कुळांची नावे अनेक आहेत. खंडोबा

आणि एकविरा देवी ही तर सर्व कोळ्यांची दैवते आहेत. परंतु महादेव कोळ्यांची वरसुबाई ही रोग बरी करणारी विशेष देवता आहे. त्यांच्या धर्मविषयक कल्पना, सणवार आणि आचार कुणब्यांप्रमाणेच आहेत. ब्रह्मदेव, मारुती, राम, शिव, कृष्ण इ. देव ते मानतात. शेतात खूप गवत माजले तर ते कणस्त्रीची प्रतिमा करुन शेतात ठेवतात. विठोबाचे माळकरीही यांच्यात आढळतात. दसरा, दिवाळी, अक्षय्यतृतीया वगैरे सण ते पाळतात. कमलजा देवीलाही पूजतात. कळसुबाई,जाकुबाई, सतुबाई, रानाई उर्फ रानबाई वगैरेही काही देवींना ते मानतात. यांचा नवस आणिं मंत्र तंत्रावर फार विश्वास असतो. त्यांच्या समाजात भगताचे महत्व असाधारण आहे. यांचा मूळ व्यवसाय पायदळामध्ये सैनिक म्हणून काम करणे हा आहे. आता ते शेती व जंगलातले पदार्थ गोळा करतात, पशुपालन करतात. बरेच जणपाटील (गावाचे प्रमुख) आणि काही देशमुख आहेत. यांचे संस्कार म्हणजे प्रथम ऋतुदर्शनात मुलीची खणा-नारळाने ओटी भरतात. गरोदर स्त्रीचे ओटीभरण करीत नाहीत. स्त्रीचे १ ले बाळंतपण सासरी होते. बाळंतीणबाज वापरीत नाही. जमिनीवरच झोपते. मूल जन्माला आले की त्याच्या अंगावर गार पाणी ओततात. त्याला ओपसावणी म्हणतात. बाळंतिणीला बाजरीचे पीठ कात बोळ्याबरोबर शिजवून देतात. त्याने तिला दूध येते अशी त्यांची समजूत आहे. पाचवीला सठीची पूजा करतात. जमलेल्या आप्तेष्टांत पाच भाकरी व चण्याच्या घुग-या वाटतात. षष्ठीपूजनाच्यावेळी सावा धान्याच्या दोन राशी जमिनीवर ठेवतात. त्यांना देवता समजून हळद-कुंकू वाहतात. त्यांच्यापुढे भात आणि तीळ यांचे ५ लाडू ठेवतात. त्यातला एक तीळ-तांदळाचा लाडू,बाळंतीण घरातील मोरीला अर्पण करते. बाळंतिणीच्या खोलीत भिंतीवर अकरा मानवाकृती काढतात. त्यांत बाहुला उर्फ बळी नावाची एक आकृती असते. तिचे डोके शेंदराने काढतात आणि पूजा करतात. त्यांना दूध, दही, खेकडा यांचा नैवेद्य दाखवतात. मूल रांगू लागले की पंचपावली करुन गृहदेवतेची पूजा करतात.मुलाचे नाव दहाव्या दिवशी ठेवतात व जावळ काही महिन्यांनी काढतात. यांच्यात जावळ काढण्याचा समारंभ असतो. जावळ गुरुवार, शुक्रवार अगर रविवार यादिवशी काढतात. मूल पाऊल टाकू लागले की पावलाच्या आकाराएवढया तांदळाच्या पिठाच्या पाच आकृत्या करुन त्या उकडून काढतात व पाच शेजा-यांना वाटतात.यांच्यात विवाह असगोत्र घराण्यात होतो. एवढेच नव्हे तर विशिष्ट गोत्रांतच विवाह होतात असे दिसते. उदा.- बांबळे गोत्रीयांचा विवाह गोडे, हिले, झांजरे, नाडकर आणि पिचड यांच्याशी होतो. भरमल गोत्रीयांचा विवाह गबाळे, पेडेकर यांच्याशीच होतो. मामाच्या मुलीशी विवाह करण्यास मान्यता आहे. परंतु आत्तेबहिणीशी किंवा मामेबहिणीशी विवाह करण्यास मान्यता

नाही. दोन बहिणींशी विवाह करण्यास मान्यता आहे. बहुपती विवाहाला मान्यता नाही. परंतु बहुपत्नी विवाहाला मान्यता आहे. विधवा पुर्नविवाह आणि घटस्फोटाला मान्यता आहे. विवाह विधी स्थानिक कुणबी लोकांशी मिळते जुळते आहेत. त्यांचे देवकही मराठा कुणबी लोकांसारखे असते. पूर्वी बालविवाह प्रचलित होता. परंतु अलिकडे सरासरी मुलाचे वय पंधरा-सोळा आणि मुलीचे त्याहून कमी असताना त्यांचे विवाह होतात. विवाह वडिल माणसांमार्फत ठरतो. मुलीचे देज देतात. प्रथम साखरपुडा होतो. विवाह मुलीच्या घरात मांडवात होतो. ठाकूरांप्रमाणे विवाहाची गाणी गाणारी धवलारीण नसते. हिंदू धर्मातील सर्व महत्वाचे उपवास व सण साजरे करतात. मृत्यू नंतर दहनविधी करतात किंवा पुरतात. मृत्यू नंतरचे विधीही स्थानिक कुणब्यांप्रमाणे असतात. पितृ पंधरवडयामध्ये मृतांची आराधना करुन तांदळाची खीर कावळ्याला अर्पण करतात आणि नातेवाईकांना जेवण देतात. जे युद्धामध्ये शहीद होतात त्यांना वीर असे म्हणतात आणि देवाबरोबर त्यांची पूजा करतात. मृताचे दहावा ते तेरावा असे दिवस करतात आणि वर्षश्राद्ध करतात. (Enthoven, R.E., 1990, Page 234-236) ,(मराठी विश्वकोश : ४, १९७६ , पृ.क्र. ४०२,३)

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत अभ्यासासाठी पुणे जिल्हा, वेल्हे तालुक्यातील नानटाकी (पुण्यापासून अंतर १२० कि.मी.), चांदर (पुण्यापासून अंतर ११० कि.मी.), निवगुणवाडी (पुण्यापासून अंतर १०८ कि.मी.) हे तीन पाडे निवडण्यात आले. सिंहगड पायथ्याशी असणा-या आतकरवाडी (पुण्यापासून अंतर २८ कि.मी.) हे गाव निवडण्यात आले. स्तरित यादृच्छीक नमुना (डीरींळषळशव ीरपवो ीराश्रिळपस) पद्धतीचा (Ahuja, 2001] Page 169) उपयोग करुन ५० स्त्रियांचा अभ्यास करण्यात आला. ३० स्त्रिया नानाटाकी, चांदर व निवगुणवाडीतील व २०स्त्रिया आतकरवाडीतील निवडल्या.पाडयांमधील बहुसंख्य स्त्रिया निरक्षर असल्याने ३० स्त्रियांकडून संशोधन कर्त्याने स्वत: आणि मदतनीसाच्या सहाय्याने तक्त्यामध्ये (schedule) माहिती भरुन घेतली. आतकरवाडीतील स्त्रिया साक्षर असल्याने, २० स्त्रियांना प्रश्नावली देऊन माहिती भरुन घेतली. वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा उपयोग प्रस्तुत अभ्यासात केला आहे. (Ahuja, 2001, Page 36)आतकरवाडी हे गाव पुण्यापासून जवळ असल्याने तेथील स्त्रियांच्या परिस्थितीचा व पाडयांमधील स्त्रियांच्या परिस्थितीचा शिक्षण व आरोग्य या मुद्दयांच्या आधारे अभ्यास करण्यात आला. वय, शैक्षणिक पातळी,व्यवसाय, कुटुंबाचा प्रकार, विवाहाच्या वेळचे वय, पहिल्या प्रसूतीच्या वेळचे वय, प्रसूतीचे ठिकाण इ. मुद्दयांचा अभ्यास करण्यात आला.

**संशोधन केलेल्या पाडयांची माहिती–**

काही घरातील मुले सुरत, मुंबई, लवासा येथे नोकरी करतात. पुरणपोळी फक्त पोळ्याला करतात. नाचणी,वरई, पावटा, भात ही पिके पिकवितात. मुलांना आहारात डाळ आणि भात दिला जातो.

**१) नानटाकी–** पुण्यापासून अंदाजे १२० किलोमीटर अतंरावर असून वेल्हे तालुक्यात आहे. येथील ७ स्त्रियांची मुलाखत घेतली असता असे लक्षात आले, वर्तमानपत्र येत नाही. वीज नाही, सौरउर्जेचा वापर करतात. झोपडीवजा घरे आहेत. शौचालयाची सोय आहे, ती शासनाने बांधून दिली आहेत.

**२) चांददर–** पुण्यापासून अंदाजे ११० किलोमीटर अतंरावर असून वेल्हे तालुक्यात आहे. येथील १४ स्त्रियांची मुलाखत घेतली असता असे लक्षात आले, वर्तमानपत्र येत नाही. वीज नाही, सौरउर्जेचा वापर करतात. पक्क्या भिंतींची घरे आहेत. शौचालयाची सोय आहे, ती शासनाने बांधून दिली आहेत.

**३) निवगुणुणवाडी–** पुण्यापासून अंदाजे १०८ किलोमीटर अतंरावर असून वेल्हे तालुक्यात आहे. येथील ९ स्त्रियांची मुलाखत घेतली असता असे लक्षात आले, वर्तमानपत्र कधी मिळाले तर वाचतात. वीज आहे, त्यामुळे मोबाईल वापरतात. नॅशनल वाहिन्या, डिश नाही त्यामुळे DVD Player वर सिनेमा पाहतात. शौचालयाची सोय आहे, ती शासनाने बांधून दिली आहेत.

वरील सर्व तीनही ठिकाणी स्त्रिया डिंक, बिब्बे, मध, चारोळेळ्या, हिरडे, मुरुडशेंगा, लाकडाच्या मोळ्या, गवत, गवऱ्या विकतात. दरमहा ४०० ते ५०० रुपये मिळवितात

**४) आतकरवाडी–** पुण्यापासून अंदाजे ३० किलोमीटर, सिंहगड पायथ्याशी हवेली तालुक्यात आहे. शासनाने राहण्यासाठी घरकुल योजनेअंतर्गत घरे आणि शौचालये बांधून दिली आहेत. घराच्या मागे व पुढे मोकळी जागा आहे. येथील स्त्रिया सिंहगडावर येणा-या पर्यटकांसाठी दही विकतात. पूर्वी जंगलातून मध, डिंक गोळा करीत असत. आता याचे प्रमाण कमी झाले आहे. सध्या पत्री, बेलपत्रे, तेरडा गोळा करुन आजूबाजूला विकतात.तसेच गवत कापण्याचे काम करतात.पुण्याच्या जवळ असल्यामुळे वरील तीन ठिकाणांपेक्षा विकसित आहे.

**निष्कर्ष–**

१. पाडयांमधील बहुसंख्य स्त्रिया निरक्षर (२१) आढळून आल्या. गावातील सर्व स्त्रिया साक्षर (२०) आढळून आल्या.
२. कुटुंबाच्या रचनेमध्ये फारसा फरक आढळून आला नाही. संयुक्त व विभक्त या दोन्ही प्रकारची कुटुंबे आढळून आली.
३. मुलगी म्हणून पालनपोषण करताना आई–वडिलांनी फरक केला का

या प्रश्नाला सर्व ५० स्त्रियांनी नाही असे उत्तर दिले. घरातील निर्णय प्रक्रियेत सहभागी होतो असे सर्व स्त्रियांनी सांगितले. प्रगत समाजापेक्षा आदिवासींमध्ये स्त्री-पुरुष समानता दिसते याचे हे द्योतक आहे.

४. आजारावर उपचार करण्यासाठी बहुसंख्य स्त्रिया (४६) दवाखान्यात जातात. यावरुन जरी औपचारिक शिक्षण नसले तरी आजारी पडल्यावर दवाखान्यात गेले पाहिजे ही समज त्यांच्यात आहे.

५. महिलांसाठीच्या योजना जवळजवळ सर्व स्त्रियांना माहित नाहीत. आदिवासींसाठी असणा-या योजनांचा, आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी जातीचे प्रमाणपत्र नसल्याने आरक्षणाचा फायदा घेता येत नाही असे सर्व स्त्रियांनी मत मांडले.

**अभ्यासाच्या मर्यादा–**

१. हा अभ्यास पुणे जिल्ह्यातील वेल्हा व हवेली तालुक्यातील तीन पाडयांपुरता व एका गावापुरता मर्यादित आहे.

२. कमी वेळात अभ्यास करावयाचा असल्यामुळे लहान नमुना (५० स्त्रिया) निवडण्यात आला.

**सूचना–**

१. सर्व आदिवासी जमातींमध्ये महादेव कोळी ही जमात प्रगत मानली जाते. पण या जमातीतील खोलवर भागातील स्त्रियांची स्थिती जाणून घेण्यासाठी अधिक सखोल अभ्यास आवश्यक आहे.

२. आरक्षणाचा फायदा कसा करुन घेता येईल याबाबत मार्गदर्शन आवश्यक आहे.

३. पाडयांवर शाळेची सोय नाही, ती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

संदर्भ –

१. डॉ. अद्यंताया, हिरा, भारतीय समाज, टि.म.वि. प्रकाशन, पुणे २००४.
2. Ahuja Ram, Research Methods, Rawat Publications, Jaipur, 2001.
3. Enthoven, R.E., The Tribes and Castes of Bombay, Asian Educational Services, New Delhi, 1990 (AES Reprint)
४. मांडे, प्रभाकर, भारतीय आदिवासी विकासाच्या समस्या, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, २००३.
५. डॉ. वाघमारे, अमोल (संपादित), आदिवासी काल आज आणि उद्या. आदिम संस्कृती, अभ्यास, संशोधन व मानव विकास केंद्र, पुणे, २०१६.
6. Gokhale, Ketaki, Waghchoure Reshma, Health Situation of Thori Women withspecific reference to Pune City, Mahrattha Peer Review Journal, T.M.V., Pune,March 2016

■■■